*Mula Education Society's*

# Arts, Commerce & Science College, Sonai

ACA - R - | जयंती,पुण्यतिथी व विशेष दिन समिती | Academic Year : 2019 - 20

Rev : 00 | स्वामी विवेकानंद, राष्ट्रमाता जिजाऊ

Date : 15.06.2019 | जयंती व राष्ट्रीय युवा दिन अहवाल | Semester : I / II

Ref: MES/ACSC/ACA/04/2019-20 | Date: 12 / 01 / 2020

**प्रास्ताविक:** कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय, सोनई येथे रविवार दि. १२/०१/२०२० रोजी सकाळी १०:००वा. सेमिनार हॉल मध्ये **'स्वामी विवेकानंद जयंती, राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व राष्ट्रीय युवा दिन'** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी 'स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ' यांच्या प्रतिमेचे पूजन महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. शंकर लावरे, डॉ. ज्ञानदेव झिने, डॉ. सिताराम रौंदळ, डॉ. निवृत्ती मिसाळ, डॉ. जगदिश सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात अनेक विदयार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.संभाजी दराडे यांनी केले.

**हेतु :**स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या कार्याची माहिती विदयार्थ्यांना व्हावी. विदयार्थ्यांमध्ये वर्क्तृत्व कला व व्यक्तीमत्व विकास घडवुन आणणे. या कार्यक्रमांच्या माध्यमातून सामाजिक जाणिवा स्पष्ट व्हाव्यात. राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या कार्याचे स्मरण होऊन त्यातून योग्य तो बोध घेऊन महिला सबलीकरणास बळकटी निर्माण व्हावी. विदयार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता वृंध्दीगत होण्यासाठी जागृती करणे. विदयार्थ्यांमधील अंधश्रध्दा दुर करणे.

**सविस्तर माहिती :** स्वामी विवेकानंद यांची १५३ वी जयंती काय्रक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविदयालयाचे शैक्षणिक समन्वयक डॉ.ज्ञानदेव झिने होते व अतिथी प्रमुख म्हणुन महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. शंकर लावरे, डॉ. सिताराम रौंदळ होते. या कार्यक्रमात डॉ.सिताराम रौंदळ यांनी विदयार्थ्यांशी संवाद साधताना म्हटले की, आजच्या तरूणांनी स्वामी विवेकानंद यांचे विचार अंगिकारले पाहिजे. १८९३ मध्ये शिकांगो मध्ये भरलेल्या सर्वधर्मीय परिषदेत वैदिक धर्माचे महत्व पटवून दिले. स्वामी विवेकानंदानी अवघे विश्‍व भारावून सोडले होते. आजही ते लाखो लोकांचे प्रेरणास्थान आहे. विविध उदाहरणे देऊन स्वामी विवेकानंद यांचे विचार आजही काळाशी सुसंगत आहे.

या महाविदयालयाचे प्राचार्य डॉ.शंकर लावरे यांनी विदयार्थ्यांशी संवाद साधताना म्हटले की, विवेकानंदाचे विचार फार मोठे परिवर्तन घडविणारे आहे. १९व्या शतकात विवेकानंदानी दिलेला विचार व मंत्र सध्याच्या स्थितीला लागू होतो. सकारात्मक विचार करा, आधुनिकतेची कास धरा, सध्याचे युग नवसंकल्पनाचे आहे. ज्याच्याकडे नवसंकल्पना आणण्याची क्षमता आहे तोच यशस्वी होणार आहे. म्हणुन सर्व विदयार्थ्यांनी स्वामी विवेकानंद यांचे चरित्र अभ्यासले पाहिजे.

राष्ट्रमाता जिजाऊ साहेबांनी तत्कालीन परिस्थितीत बालशिवबावर संस्कार करणारी पहिली आदिशक्ती स्वरूप माता होती. आईने मुलांवर कसे संस्कार करावेत याचा आदर्श पुढील पिढीने घेतला पाहीजे. शिवाजी राजांच्या मार्गदर्शिका, संकटमोचन, प्रेरकशक्ती म्हणून जिजाऊ होत्या. बालशिवरायांच्या मनात पेटविलेली स्वराज्याची ज्योत कायम पेटती ठेवण्याचे कार्य जिजाऊंनी केले. पतीच्या निधनानंतरही जिजाऊंनी सती जाण्याचे नाकारून शिवबा व जनतेच्या कल्याणासाठी शेवटच्या श्‍वासापर्यंत कार्यरत राहील्या. जिजाऊ या तत्कालीन व आजच्या समाजाच्या प्रेरक रूप समजून घेऊन वर्तमानात वाटचाल करण्याची गरज आहे. आजच्या समाजात विविध प्रकारचे गट, तट पडत चालले असतांना अशावेळी महामानवांचे विचार समाजाला एकसंघ करू शकतात.

या कार्यक्रमाप्रसंगी प्रास्ताविक करताना डॉ.संभाजी दराडे यांनी राष्ट्रीय युवा दिनाचे महत्व स्पष्ट केले. डॉ. ज्ञानदेव झिने यांनी आपले अध्यक्षीय मनोगत करतांना म्हटले की, आजच्या युवकांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून वाटचाल करावी. विज्ञान युगात वावरतांना सामाजिक जाणिवा, जबाबदा—या स्विकारून कुटूंबाबरोबर राष्ट्रीय एकात्मता टिकवण्यासाठी झटले पाहिजे. आजचा भारत नवयुवकांचा आहे. म्हणून विदयार्थ्यानी अंधश्रध्देचा व दृष्ट प्रथांचा त्याग करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. यावेळी सर्वश्री विदयार्थी अदिनाथ औटी, अंकीता वाघ, धनश्री

तारडे, प्राजक्ता निमसे, बिपीन टेमक यांनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.अंशिका हिवाळे व कु.नेहा पवार यांनी केले. सदर कार्यक्रमास डॉ.निवृत्ती मिसाळ, प्रा.बाळासाहेब शिंदे, प्रा.बाळासाहेब खेडकर, डॉ.हरिभाऊ कर्डीले उपस्थित होते तर विदयार्थी मोठया संख्येने हजर होते.

**इतर माहिती :**

| दिनांक | वेळ | उपक्रमाचे नाव | समन्वयकाचे नाव | मार्गदर्शकाचे नाव | | | | एकुण सहभागी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नाव | पद | संपर्क | पत्ता | शिक्षक | | विदयार्थी | |
| | | | | | | | | स्त्री | पुरूष | स्त्री | पुरूष |
| १२/०१/२०२० | स. १०:०० | स्वामी विवेकानंद जयंती, राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व राष्ट्रीय युवा दिन | डॉ. संभाजी दराडे | प्राचार्य डॉ. शंकर लावरे<br>डॉ. ज्ञानदेव झिने<br>डॉ. सिताराम रौंदळ | प्राचार्य<br>सहयोगी प्राध्यापक<br>सहयोगी प्राध्यापक | ९८२२७४२३८४<br>९७६७८७२४२७<br>९८२२४३९२६७ | सोनई ता. नेवासा | ०० | ०७ | ७८ | १६ |

**कार्यक्रम फोटो**









